**आदेश**

क्र.कावि/कक्ष7:2/प्रअभूसं/न.क्र.102/कावि-/2972/19
जिल्हाधिकारी कार्यालय बुलडाणा
दिनांक- 16 / 10 / 2019

विषय :- भूसंपादन प्रकरण क्रमांक १२/२००८-०९ मौज मानेगांव (बुडीत क्षेत्र) ता.जळगाव जामोद मध्ये प्रारुप निवाडयास ६ महिन्याची मुदतवाढ देणेबाबत.

संदर्भ:- विशेष भूसंपादन अधिकारी कं.क्र.२ जिगांव प्रकल्प जि.का.बुलडाणा यांचे पत्रक्र. कावि/अका/कं.क्र.२ /३५६/२०१९ दिनांक १४-१०-२०१९.

******

ज्या अर्थी विशेष भूसंपादन अधिकारी कं.क्र.२ जिगांव प्रकल्प जि.का.बुलडाणा यांनी त्यांच्या संदर्भीय पत्रानुसार भूसंपादन प्रकरण क्रमांक १२/२००८-०९ मौज मानेगांव (बुडीत क्षेत्र) ता.जळगाव जामोद मध्ये प्रारुप निवाडयास ६ महिन्याची मुदतवाढ मिळणेबाबत प्रस्ताव सादर केला आहे.

सदर प्रकरणात फळझाडे मुल्यांकन हे विशेष चौकशी समिती यांच्या विचाराधीनआहे.तसेचशेतीवरील मालमताचे मुल्यांकन देखील यंत्रणेकडुन आजपर्यंत प्राप्त झालेले नाही. त्यांनी दिनांक ०८-१०-२०१९ रोजीच्या पत्रामध्ये यावर्षी सतत पाऊस असल्यामुळे शेतावर मोजणी करणे शक्य झाले नाही. तरीच यापुढे मोजणी करणे, अंदाजपत्रक तयार करणे, तपासणी करणे व त्यास मान्यता घेणे याबाबीसाठी कालावधी आवश्यक आहे.त्यामुळे मुदतवाढ घेणे गरजेचे आहे असे नमुद करुन प्रकरणात प्रारुप निवाडयासाठी आवश्यक ती मुदतवाढ घेण्याबाबत विनंती केलेली आहे.

विशेष भूसंपादन अधिकारी कंत्राटी- २ जि.का.बुलडाणा यांनी यंत्रणेकडुन शेतीवरील मालमता मुल्यांकन प्राप्त करणे व तद्नंतर भूसंपादन अधिकारी यांचे स्तरावरील कार्यवाहीसाठी ६ महिन्याचा कालावधी लागु शकतो त्यामुळे यंत्रणेने विनंती केल्यानुसार व आवश्यकता असल्याने प्रकरणात दिनांक २१-०५-२०२० पर्यंत पुढील ६ महिन्याची प्रारुप निवाडयाकरीता मुदतवाढ मिळण्याबाबत विनंती केली आहे.

ज्याअर्थी भूसंपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत यामध्ये पारदर्शकता राखण्याचा हक्क अधिनियम 2013 चे कलम 25 मध्ये जिल्हाधिकारी,कलम 19 अन्वये घोषणा प्रसिध्द केल्याच्या तारखेपासून बारा महिन्याच्या कालावधीत निवाडा देईल आणि जर त्या कालावधीत निवाडा देण्यात आला नाही तर जमीन संपादनाची संपूर्ण कार्यवाही रद्द होईल.

परंतु,त्याचे समर्थन करणारी, परिस्थिती अस्तित्वात असेल तर, समुचित शासनाला बारा महिन्यांच्या कालावधीत वाढ करण्याचा अधिकार असेल.

परंतु आणखी असे की, कालावधी वाढविण्याचा असा कोणताही निर्णय लेखी स्वरुपात नोंदविण्यात येईल आणि तो अधिसूचित करण्यात येईल आणि संबंधित प्राधिकरणाच्या वेबसाईटवर टाकण्यात येईल. अशी तरतूद आहे.

तरी भूमि संपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत यामध्ये पारदर्शकता राखण्याचा हक्क अधिनियम २०१३ चे नियम २५ नुसार भुसंपादन प्रकरण क्र. १२/२००८-०९ मौज मानेगांव (बुडीत क्षेत्र) ता.जळगाव जामोद जि.बुलडाणा या प्रकरणात प्रारुपनिवाडा करण्यास ०६ (सहा)महिन्याची मुदतवाढ देण्यांत येत आहे.

(डॉ.निरुपमा डांगे)
जिल्हाधिकारी बुलडाणा